## पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम - मार्गदर्शक सुचना २०१२-१३

**“ पाणलोट विकास मंत्र खरा**
**कोरडवाहू शेती समृध्द करा ”**

**प्रस्तावना :-**

राज्यातील बहुतांशी क्षेत्र कोरडवाहू असुन उपलब्ध जलस्त्रोताचा उपयोग केला तरी देखील ७० टक्केपेक्षा जास्त क्षेत्र कायमस्वरुपी नैसर्गिकरित्या पडणा-या पावसावरच अवलंबुन रहाणार आहे. हे लक्षात घेवून, पाणलोट विकासाचा कार्यक्रम गेल्या अनेक वर्षापासून राज्यात सूरू असून सुरू केलेले पाणलोट मोठया प्रमाणावर अपूर्ण आहेत. हे पाणलोट गतीमान पध्दतीने विकसीत करण्याचा धडक कार्यक्रम देखील शासनाने हाती घेतला आहे. महात्मा ज्योतीबा फुले जल व भूमी संधारण अभियान प्रामुख्याने लोकसहभागातून राबविणे राज्यात गेली काही वर्षे सुरू आहे. या व्यतिरीक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत देखील जलसंधारणाच्या कामास फार मोठे महत्व आहे. पर्जन्याधारीत क्षेत्रातील उत्पन्नाचे सातत्य टिकविण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन करणे, संरक्षित जलसिंचनाची साधने निर्माण करणे, जमिनीची होणारी धूप थांबविणे, पडीक जमिनीचा विकास करुन ग्रामीण भागातील उत्पन्न व उत्पादनाची साधने वाढविणे, विविध उपचाराव्दारे पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत बळकट करणे आणि भूगर्भातील पाणी काटकसरीने व आवश्यकतेनुसार उपयोगात आणणे. या सर्व उपचारानी राज्यात मृद व जलसंधारणाचा कार्यक्रम विविध राज्य व केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक स्तरावर लोक सहभागाची नितांत आवश्यकता आहे.

राज्यातील पाणलोट विकासाकरिता उपलब्ध असलेल्या क्षेत्राची व्यापकता फार मोठी असल्याने, मृद व जलसंवर्धनाचे उद्दिष्ट सर्वसामान्य जनतेपर्यत पोहोचविण्यासाठी पाणलोट विकास चळवळ कार्यक्रम सन २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. याच धर्तीवर सदर कार्यक्रम सन २०१२-१३ मध्येही राबविणेसाठी शासन निर्णय क्र.पाविच-२०१२/प्रक्र-६२/जल-८ दि.२८ मे,२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे. या चळवळीचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

१. पाणलोट विकास कार्यक्रमांना विविध प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्दी देणे.
२. ग्रामीण भागातील जनतेमध्ये जल, भूमी व इतर नैसर्गिक साधनसंपत्ती सवंर्धनाबाबत आस्था निर्माण करणे.
३. जलसंधारण कामांना अधिक गती देणे.
४. पाणलोट विकासाच्या विविध टप्प्यामध्ये जनजागृतिव्दारे लोकसहभाग घेणे.
५. पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निर्माण केलेल्या विविध स्त्रोताचे जतन करण्यासाठी लोक जागृती निर्माण करणे.
६. उपलब्ध भूपृष्ठावरील आणि भूगर्भातील पाण्याचा काटकसरीने वापर करुन उत्पन्न आणि उत्पादन वाढविण्यास शेतक-यांना प्रवृत्त करणे.

**योजनेतील समाविष्ट घटक :-**

पाणलोट विकास चळवळ कार्यक्रमामध्ये खालील उपक्रमाचा समावेश राहील.

**१. मुद्रण माध्यमांव्दारे प्रसिध्दी :**

**१.१)** पाणलोटांतर्गत घेण्यात येणा-या विशेष उपचारांची व योजनांची जनसामान्यांना माहिती होणेचे दृष्टीने पाणलोट विषयक रंगीत पानाची जाहिरात राज्यातील अ व ब वर्ग वृत्तपत्रामधून माहिती व जनसंपर्क कार्यालय, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्रसिध्द करणेत येईल. यामध्ये जाहिरात निर्मिती करणे, जाहिरातीचे

http://mahaagri.gov.in

आर्टवर्क करणे, जाहिरात प्रसिध्द करणे व इतर अनिषंगीक बाबीचा समावेश राहील. सदर घटकाची अंमलबजावणी करणेसाठी रक्कम रू.१०.०० लाख निधी मंजुर आहे.

१.२.)पाणलोट विषयक माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पाणलोट कार्यक्रमाची माहिती देणारी प्रकाशने, पूर्ण झालेल्या पाणलोटांच्या यशोगाथांचे संकलन करुन कृषि विभागाच्या शेतकरी मासिकामध्ये प्रसिध्द करण्यात येतील. तसेच पाणलोट विषयक यशोगाथा पुस्तिकाव्दारे प्रसिध्दी करणे यासारखी कामे हाती घेणेत येतील. सदर घटकाची अंमलबजावणी करणेसाठी रक्कम रू.५.०० लाख निधी मंजुर आहे. सदरचे दोन्ही घटक आयुक्तालयस्तरावरुन राबविण्यात येतील.

**२. इलेक्ट्रॉनिक्स मिडीयाद्वारे प्रसिध्दी :**

**२.१ पाणलोट विषयक ऑडिओ जिंगल्स/स्पॉट निर्मिती व आकाशवाणीवरुन प्रसारण करणे.**

मृद व जलसंधारणाचे महत्व पटवून देणे तसेच जलसंधारणातून उपलब्ध झालेल्या पाण्याचा काटकसरीने आणि परिणामकारक वापर करणे, जलसंधारणाबाबत जनसामान्यात जागृती निर्माण करणे व त्याचे महत्व पटवून देणारे ३० ते ४० सेकंद कालावधीचे पाणलोट विषयक ऑडिओ जिंगल्स/स्पॉटची निर्मिती करण्यात येईल. निर्मिती केलेले ऑडिओ जिंगल्स/स्पॉटचे प्रसारण आकाशवाणीच्या पुणे व मुंबई केंद्रामार्फत करणेत येईल. या कार्यक्रमासाठी रक्कम रु.१५.०० लाख निधी मंजुर आहे. सदरचा कार्यक्रम आयुक्तालय स्तरावरुन राबविण्यात येईल.

**२.२ पाणलोट विषयक व्हिडीयो  जिंगल्स/स्पॉट निर्मिती व दूरदर्शनवरुन प्रक्षेपण करणे. खाजगी वाहिनीवरुन स्क्रोलचे प्रक्षेपण करणेः**

या बाबी अंतर्गत पाणलोट विषयक व्हिडीओ जिंगल्स/स्पॉट निर्मिती करणे  व त्याचे दूरदर्शनवरुन प्रक्षेपण करणे कामाचा समावेश असेल. यामध्ये मूलस्थानी मृद व जलसंधारण तंत्रज्ञान, पाणलोटाच्या यशोगाथा, शेततळे प्रकल्प, सिंमेट चेकडॅम प्रकल्प या विषयाचे व्हिडीयो जिंगल्स/स्पॉट निर्मिती करणेत येईल. तसेच जलसंधारण विषयक कार्यक्रमाच्या माहितीचे स्क्रोल्स तयार करुन दुरदर्शन  व खाजगी वाहिनीवरुन प्रक्षेपित करण्यात येतील. सदर कार्यक्रमासाठी रक्कम रू.१०.०० लाख निधी मंजुर आहे. सदरची बाब आयुक्तालयस्तरावर राबविण्यात येईल.

**२.३ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अधिकृत केलेल्या परवानाधारकामार्फत बसस्थानकावरून संगणकीय उद्घोषण दरम्यान पाणलोट विषयक ऑडिओ जिंगल्स/स्पॉटचे प्रसारण करणे :**

पाणलोट विकास तंत्रज्ञान व योजनांचा प्रचार व प्रसार सर्वदूर होणेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या निवडक बसस्थानकावरून संगणकीय उद्घोषण दरम्यान पाणलोट विषयक ३० सेंकद कालावधीचे जिंगल्स/स्पॉटचे प्रसारण महामंडळाने अधिकृत केलेल्या परवानाधारकामार्फत करण्यात येईल. सदरचा कार्यक्रम माहे जुन ते जुलै व माहे ऑक्टोबर ते डिंसेबर या कालावधीत राबविण्यात येईल. सदरचा कार्यक्रम राबविण्यासाठी रक्कम रू.४४.०० लाख निधी मंजूर आहे. सदरची बाब आयुक्तालयस्तरावरुन राबविण्यात येईल.

**३. जनजागृती कार्यक्रम :**

**राष्ट्रीय वृत्तपत्रे,संस्था यांचे सोबत प्रायोजकत्व स्वीकारून विभाग/जिल्हास्तरावर शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धांचे आयोजन करणे :**

पाणलोट विषयाचे महत्व शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांमध्ये पटविणेकरिता प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी  पाणलोट विषयावरील चित्रकला स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे. चित्रकला स्पर्धा

http://mahaagri.gov.in/

आयोजन करण्याची कार्यवाही विभाग/जिल्हास्तरावर करणेत यावी. सदरची स्पर्धा आयोजित करताना कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्थानिक राष्ट्रीय वृत्तपत्रे,संस्था यांना देण्यात यावे,जेणेकरुन स्पर्धेची प्रसिध्दी मोठया प्रमाणात होवून स्पर्धेसाठी विद्यार्थ्याचा प्रतिसाद भरघोस मिळेल. सदरच्या स्पर्धा दिन विशेष दिन जसे, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र दिन, कृषि दिन,बाल दिन या सारख्या विशेष दिनी स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. स्पर्धा आयोजित करण्याविषयी सूचना खालीलप्रमाणे राहातील.

**स्पर्धेचे विषय -**

| अ.क्र | स्पर्धेचा गट | विषय | आकार | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक गट | माझे गाव, माझी शेती | ३५ X २८ सें.मी. | क्रेआन कलर/पेंस्टल खडु/पेन्सिल |
| २ | माध्यमिक गट | समस्या वाढत्या पाणी टंचाईच्या | ३५ X २८ सें.मी. | वॉटर कलर/पोस्टर कलर |

**बक्षिसाची रक्कम -**

| अ.क्र. | स्पर्धेचा गट | स्तर | स्पर्धेचे विषय | पारितोषिक रक्कम (रूपये) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम | व्दितीय | तृतीय |
| १. | प्राथमिक गट | जिल्हास्तर | माझे गाव, माझी शेती | २००० | १००० | ५०० |
| | | विभाग स्तर | | ५००० | ३००० | २००० |
| | | राज्यस्तर | | ७५०० | ५००० | ३००० |
| २ | माध्यमिक गट | जिल्हास्तर | समस्या वाढत्या पाणी टंचाईच्या | ४००० | २५०० | १५०० |
| | | विभाग स्तर | | ७५०० | ५००० | ३००० |
| | | राज्यस्तर | | १०००० | ७५०० | ५००० |

**स्पर्धेचे नियम :**

**अ)** चित्र काढण्यासाठी स्पर्धकाला दिलेल्या माध्यमांचाच वापर करता येईल.

**ब)** चित्राच्या मागील बाजूस स्पर्धकाचे नांव,शाळा/संस्थेचे नांव, इयत्ता, तूकडी व पत्ता, इ.चा तपशील देणेत यावा.

**क)** चित्र काढणेसाठी विभागीय कृषि सहसंचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत पेपर पुरविला जाईल.

**ड)** स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या स्पर्धकांच्या साहित्याचा प्रसिध्दीसाठी वापर करण्याचा पूर्ण अधिकार कृषि विभागाकडे राहील.

**इ)** परिक्षकांचा निर्णय स्पर्धकावर बंधनकारक राहील.

**ई)** सर्व यशस्वी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील.

**जिल्हास्तरावरील बक्षिस निश्चिती करण्याची कार्य पध्दती :**

जिल्हास्तरावर स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचे क्रमांक निश्चित करणेसाठी खालीलप्रमाणे समितीचे गठन करण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| १. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | अध्यक्ष |
| २. प्रायोजकत्व स्विकारलेल्या वृत्तपत्राचे/ संस्थेचे अधिकारी | - | सदस्य |
| ३. चित्रकला तज्ञ | - | सदस्य |

http://mahaagri.gov.in/

वरील समितीने जिल्हास्तरावर आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेमधून प्राथमिक व माध्यमिक गटामधुन प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक बक्षिस निश्चिती करून प्रथम व द्वितीय क्रंमाक विजेत्याची नामांकने व चित्रे विभागस्तरावर पुढील कार्यवाहीसाठी पाठवावीत. विभागस्तरावरील बक्षिस विजेत्या विदयार्थ्यांचा बक्षिस वितरण व सत्कार समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात यावा. तसेच या कार्यक्रमाची प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्रातून करण्यात यावी.

**विभागस्तरावरील बक्षिस निश्चिती करण्याची कार्य पध्दती :**

विभागस्तरावर स्पर्धेमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांचे क्रमांक निश्चित करणेसाठी खालीलप्रमाणे समितीचे गठन करण्यात यावे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभागीय कृषि सह संचालक | - | अध्यक्ष |
| २. | प्रायोजकत्व स्विकारलेल्या वृत्तपत्राचे/ संस्थेचे अधिकारी | - | सदस्य |
| ३. | विभागीय अदिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| ४. | चित्रकला तज्ञ | - | सदस्य |

या समितीने जिल्हास्तरावरून प्राप्त झालेल्या नामांकनातून विभागस्तरावर प्राथमिक व माध्यमिक गटामधुन प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिस निश्चिती करावी. विभागस्तरावरील प्रत्येक गटामधून **<u>फक्त प्रथम क्रमांक</u> प्राप्त विजेत्याचे नामांकन राज्यस्तरीय बक्षिस निश्चितीकरिता कृषि आयुक्तालयास दिनांक २८ फेब्रुवारी, २०१२ पर्यत पाठविण्यात यावीत.**

विभागस्तरावरील बक्षिस विजेत्या विदयार्थ्यांचा बक्षिस वितरण व सत्कार समारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात यावा. तसेच या कार्यक्रमाची प्रसिध्दी स्थानिक वृत्तपत्रातून करण्यात यावी.

**राज्यस्तरावर बक्षिस निश्चिती करण्याची कार्य पध्दती :**

विभागस्तरावरून प्राप्त झालेल्या प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकाच्या नामांकनातून आयुक्त कृषि, संचालक (मृ.सं.) व सहसंचालक (मृ.स.) यांच्या समितीमार्फत प्राथमिक व माध्यमिक गटामधुन राज्यस्तरावर प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे निश्चित करण्यात येवून राज्यस्तरावरील प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे घोषित करण्यात येतील.

चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्याकरिता व विद्यार्थ्यांना बक्षिसाची रक्कम देणेकरिता रक्कम **रू.९.००** लाख मंजुर आहे. सदर निधीतुन प्रत्येक विभागाला बक्षिसाची रक्कम व स्पर्धेचे आयोजन करणेसाठी (पेपर खरेदी, चित्रकला तज्ञांचे मानधन, चित्रकला स्पर्धा आयोजित करणेसाठी हॉलचे भाडे, स्पर्धा आयोजनासाठी प्रचार व प्रसिध्दी इ. अनुषंगीक खर्च) निधी वितरित करण्यात येईल.

**४) राज्यस्तरावर व विभागस्तरावर पाणलोट विषयक कार्यशाळाचे आयोजन करणे :**

मृद व जलसंधारण कार्यक्रमाचे महत्व, विविध उपचार पध्दती, उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा परिणामकारक वापर, योग्य पीक पध्दतीचा अवलंब करुन उत्पादन व उत्पादकता वाढविणे इ.बाबत अधिकारी/ शेतक-यांना तांत्रिक मार्गदर्शन करणेसाठी **राज्यस्तरावर व विभागस्तरावर** चर्चासत्र/कार्यशाळांचे आयोजन करावयाचे आहे. चर्चासत्रासाठी/कार्यशाळेसाठी लोकप्रतिनिधी, जलसंधारणाचा कार्यक्रम राबविणा-या इतर यंत्रणेचे अधिकारी, कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, कृषि संशोधन केंद्राचे अधिकारी, मृद व जलसंधारण क्षेत्रातील नामवंत व्यक्ती व स्वयंसेवी संस्थाचा सहभाग घेण्यात यावा. या बाबीसाठी एकूण रक्कम **रु.७.०० लाख** निधीची तरतूद करणेत येत आहे.

http://mahaagri.gov.in/

विभागस्तरावर चर्चासत्र/कार्यशाळाचे आयोजन करण्यासाठी प्रत्येकी रक्कम **रु.०.६५ लाख निधीची तरतूद राहील.** सदर निधीमधून कार्यशाळा आयोजन करणेसाठी आवश्यक खर्च करण्यात यावा.

राज्यस्तरावरील चर्चासत्र/कार्यशाळेचे आयोजन मा.मंत्री (रोहयो व जलसंधारण) यांचे मान्यतेने करण्यात येईल. राज्यस्तर कार्यशाळा/चर्चासत्र आयोजन करणेसाठी रक्कम **रु.१.८० लाख** निधीची तरतूद करण्यात येत आहे.

**योजनेचे लेखाशिर्ष :**

योजनेतंर्गत राबविण्यात येणा-या बाबीचा खर्च खालील लेखाशिर्षात टाकणेत यावा.

**"मागणी क्र.एल-७,**
**४४०२- मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च,**
**१०२ मृदसंधारण (०१) राज्य योजना पंचवार्षिक योजनांतर्गत योजना**
**(०१)(२१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम,प्रसिध्दी व पारितोषिक योजना**
**(४४०२ २३५१)**
**२६ जाहिरात व प्रसिध्दी.**

**योजनेचा प्रगती अहवाल -**

योजनेअंतर्गत राबविलेल्या बाबीचा बाबनिहाय अहवाल प्रत्येक महिन्याचे १० तारखेपर्यंत सादर करण्यात यावा. खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र (विहीत नमुन्यातील) कृषि आयुक्तालयास दि. १० एप्रिल २०१३ पर्यंत सादर करण्यात यावे.

स्वाक्षरीत/-
संचालक,
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१

---

जा.क्र.मृदसं/पाणविका/मासु/१२-१३/१५२७/मृद-१/१२
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११००१ दि. १८ जून,२०१२

प्रति,

१. विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)
यांना माहिती व कार्यवाहीस्तव रवाना

http://mahaagri.gov.in/